# ऑनलाइन गेम्स आणि सायबर फसवणुकीपासून

# सावध राहा : सायबर वॉरिअर नरेश पंडित

लातूर/प्रतिनिधी :

येथील राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर व क्विक हिल फाऊंडेशन, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने लातूर जिल्ह्यात राबविण्यात येत असलेल्या 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' या जनजागृती उपक्रमांतर्गत श्री किशन सोमानी स्कूल, मोरे नगर, लातूर येथे विद्यार्थ्यांसाठी सायबर सुरक्षा जनजागृती सत्राचे आयोजन करण्यात आले. दि. २४ जुलै २०२६ रोजी सकाळी ८.४५ ते ९.४० या वेळेत आयोजित करण्यात आलेल्या या सत्रात इयत्ता ५ वी ते ७ वी मधील सुमारे २५० विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.



या सत्रात सायबर वॉरिअर नरेश पंडित व सायबर वॉरिअर अविष्कार कांबळे यांनी विद्यार्थ्यांना ऑनलाइन गेम्स खेळताना घ्यावयाची काळजी, गेमच्या माध्यमातून होणाऱ्या फसवणुकीचे प्रकार, अनोळखी व्यक्तींशी ऑनलाइन संवाद टाळण्याचे महत्त्व तसेच वैयक्तिक माहिती, पासवर्ड किंवा जढ्ढ कोणालाही शेअर करू नये, याबाबत मार्गदर्शन केले. तसेच मजबूत पासवर्ड कसा तयार करावा, याची सोप्या उदाहरणांसह माहिती देण्यात आली.

यावेळी विद्यार्थ्यांना मोबाईल आणि इंटरनेटचा सुरक्षित वापर, सोशल मीडियावर जबाबदारीने वावरणे, संशयास्पद लिंक व संदेशांपासून सावध राहणे तसेच ऑनलाइन फसवणुकीचा बळी ठरल्यास राष्ट्रीय सायबर हेल्पलाईन क्रमांक १९३० वर त्वरित संपर्क साधून तक्रार नोंदविण्याबाबतही मार्गदर्शन करण्यात आले. संवादात्मक पद्धतीने पार पडलेल्या या सत्रात विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग घेत विविध प्रश्न विचारून आपल्या शंकांचे निरसन करून घेतले. कार्यक्रमास विद्यालयाचे मुख्याध्यापक रमाकांत स्वामी सर यांची प्रमुख उपस्थिती लाभली. शिक्षकवृंदाच्या सहकार्याने कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला. विद्यार्थ्यांनी सायबर सुरक्षेची माहिती उत्साहाने आत्मसात करत भविष्यात ऑनलाइन जगात अधिक सतर्क राहण्याचा निर्धार व्यक्त केला.